# 'ब्रेक्झिट'चा अन्वयार्थ

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

२३ जूनला युरोपिअन युनियनमध्ये (यापुढे युनिअन किंवा संघटना) ब्रिटनने राहायचे का नाही यावर ब्रिटनमध्ये सार्वमत घेण्यात आले. (रहायचे नाही - Britain's Exit, म्हणून Brexit. यासाठी 'नको-रे' हा शब्द वापरला आहे). त्यात ५२% लोकांनी बाहेर पडावे असा कौल दिला. ही संख्या युनिअनमध्ये रहावे (हवे-रे) अशा मताच्या लोकांपेक्षा दहा लाखाने जास्त आहे. (एकूण मतदार तीन कोटी पस्तीस लाख). हा कौल इतका निर्णायक असेल आणि नको-रेच्या बाजूने जाईल, याची कोणालाच अपेक्षा नव्हती. मतदारांच्या या निर्णयाने ब्रिटनच नव्हे तर युरप व जगभर खळबळ माजली.

**युरोपिअन युनिअन**

दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रवादाच्या उन्मादात तेव्हा झाला तसा नरसंहार भविष्यात होऊ नये म्हणून व्यापाराने युद्धातील शत्रूंना एकत्र बांधावे या संकल्पनेतून युनिअनचा जन्म झाला. हळूहळू सदस्य देशांची संख्या वाढत ती आज २८ देशांची संघटना आहे. ब्रिटन गेली चाळीस वर्षे तिचा सभासद आहे. जर्मनीबरोबर तो यातील श्रीमंत देश आहे. युनिअन जगातील सर्वात मोठी बाजारपेठ आहे आणि सगळे देश थोड्या फार फरकाने लोकशाही आहेत. एकूण लोकसंख्या ५१ कोटी. युनिअनच्या प्रदेशात भांडवल, माल, लोक व सेवा यांच्या मुक्त संचाराला घटनेनुसार परवानगी आहे. प्रत्येक देशाची कायदा व गृह-खात्याची धोरणे बहुश: युनिअन ठरवते. युनिअन अमेरिकेबरोबर NATO (अमेरिका व युरप) च्या या लष्करी संघात आहे त्यामुळे सभासद देशांवर अमेरिकेचे संरक्षणछत्र आहे. तिचे प्रमुख कार्यालय बेल्जियम देशाची राजधानी ब्रसेल्स येथे आहे. युनियनची स्वत:ची संसद आहे. त्यात प्रत्येक देशाचे खासदार असतात. पण प्रचंड पगार असणारी अवाढव्य नोकरशाहीच सभासद देशांवर नियंत्रण करते. नोकरशाहीचे कायदे, नियम यांचे जंजाळ हा कायम टीकेचा विषय असतो.

**युनिअन सोडण्याचा ब्रिटनचा निर्णय**

या निर्णयाला अनेक पदर आहेत. ते उर्वरित जगालाही लागू पडतात म्हणून विवेचन जरा सविस्तर आहे. उदाहरणार्थ एखाद्या समाजाच्या प्रवृत्तीला संकुचित, प्रतिगामी दृष्टिकोन केव्हा म्हणायचे आणि म्हणून तो दृष्टिकोन गर्ह्य केव्हा मानायचा आणि अस्मिता केव्हा म्हणायचे आणि ती स्तुत्य मानायची -यातील सीमा काटेकोर ठरवणे अशक्य आहे. सार्वमताकडे वळता, निखळ आर्थिक मुद्द्यांवर मतदान झाले नाही. भावनिक प्रवाह जास्त जोरदार ठरले. ब्रिटनसारख्या लोकशाहीची दीर्घ परंपरा असणाऱ्या तथाकथित परिपक्व देशाकडून भावनेच्या भरात, अप-प्रचारावर विश्वास ठेऊन इतक्या महत्त्वाचा निर्णय घेतला जाणे हे जागतिक राजकारणाच्या खालावलेल्या पातळीचे दर्शन म्हणावे लागेल. लोकांच्या भावना युनिअनविरुद्ध भडकावण्यात राजकीय पक्ष व छापील सवंग वृत्तपत्रे यांनी मोठा हातभार लावला. त्यांचे प्रमुख मुद्दे असे :

आपल्या राजकीय नेतृत्वाला आपले भविष्य ठरवण्यात रस नाही व त्यांची ती क्षमताही नाही. एकूणच राजकीय नेतृत्व स्वार्थी, अदूरदर्शी, जनतेपासून अलिप्त व अप्रामाणिक असते. त्यामुळे त्यांना जनतेच्या गरजांची फिकीर नाही. एकूण व्यवस्थेचे हित-संबंध पाळणारे राजकारण समाज-परिवर्तन इष्ट दिशेला नेण्याचे साधन राहिलेले नाही. त्याबरोबरच जागतिकीकरणाच्या रेट्याखाली सरकार बडे उद्योग, आर्थिक संस्था यांना अनुकूल आहे. हे लोकमत सर्वत्र लागू दिसते. (उदा. अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्पचा उदय). सार्वमताच्या संदर्भात ब्रसेल्समधील नोकरशाही अनिर्वाचित असल्याने ब्रिटीश नागरिकाच्या हिताचे निर्णय घेण्याऐवजी जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांची धोरणे राबवते असा ग्रह दिसला. उदा, ग्रीस देश नाणेनिधीने अधिकच भिकेला लावला आणि त्यांच्या कर्जाचे ओझे आमच्या डोक्यावर आले, ही भावना.

दुसरा जिव्हाळ्याचा मुद्दा इतर देशांतून ब्रिटनला कामासाठी येणारे स्थलांतरित. आकडेवारीप्रमाणे १९३१मध्ये ब्रिटनच्या लोकसंख्येच्या फक्त पावणेदोन टक्के लोक परदेशात जन्मले होते. २०११पर्यंत ही संख्या इंग्लंड व वेल्समध्ये २० टक्केपर्यंत गेली. (ब्रिटनचे चार भाग - इंग्लंड, वेल्स, स्कॉटलंड आणि उत्तर आयर्लंड). तोपर्यंत स्थलांतरित बहुतांशी भारत, पाकिस्तान, जमायका वगैरे आधीच्या ब्रिटीश वसाहतीतून आलेले. मात्र युनिअनच्या संचार-स्वातंत्र्याच्या धोरणामुळे आधीच्या पूर्व युरपमधून येणाऱ्या लोकांची संख्या अचानक वाढली. त्यातील फरक लक्षणीय आहे. युनिअनच्या बाहेरून एखाद्याला (समजा, भारतीय software इंजिनिअर किंवा डॉक्टर) ब्रिटनमध्ये नोकरी करायची असेल, तर अनंत अडचणी असतात. किमान उच्च शिक्षण लागते, नोकरीची हमी, मिळणारे वेतन सामान्य ब्रिटीश वेतनाहून

बरेच जास्त असणार अशी हमी नोकरीला लावणाऱ्याने देणे, इत्यादी. या उलट रोमानिया किंवा पोलंडहून येणारा मजूर केवळ युनिअनच्या देशात आहे म्हणून ब्रिटनला सहज येऊ शकतो व काम करू शकतो. यातील बऱ्याच मंडळींना इंग्रजी भाषा येत नाही व जरुरीही नसल्याने बरचसे इंग्रजी शिकतही नाहीत. त्यांचे मुख्य प्रवाहापासून अलिप्त रहाणे मुख्य प्रवाहाला खुपते.

स्थलांतरित पूर्व युरोपिअन बहुधा अर्ध/अकुशल व्यवसायात असतात - शेत-मजुरी, बांधकामावर गवंडी, खानावळी, हॉटेल्स येथे वेटर्स, वगैरे. हे लोक आमच्या नोकऱ्या घेतात, यांच्या मुलांमुळे आमच्या मुलांना हव्या त्या शाळांत प्रवेश मिळत नाही (शालेय शिक्षण मोफत आहे), यांच्यामुळे राष्ट्रीय वैद्यकीय सेवेवर (जी ब्रिटनमध्ये सर्वांसाठी मोफत आहे) ताण येतो व ती हव्या त्या सुलभतेने एतद्देशीयांना उपलब्ध होत नाही वगैरे प्रचार नको-रे वाद्यांनी लावून धरला. वस्तुत: या स्थलांतरितांवर ब्रिटिश सरकार जेवढा खर्च करते, त्याहून फार मोठ्या प्रमाणात ते अर्थ-व्यवस्थेत भर टाकतात, म्हणजे, देशाला अधिक समृद्ध करतात हे वारंवार सिद्ध झालेले आहे. शिवाय हे लोक इतर ब्रिटीश जी कामे दिवसाकाठी दहा-बारा तास, प्रसंगी कायदेशीर कराराखेरीज, त्या वेतनावर करणार नाहीत, ती कामे निमूटपणे करतात - या सगळ्याकडे गैरसोयीचे मुद्दे म्हणून हेतुत: दुर्लक्ष झाले. बेफाम विधाने करणे व जनमत वहावणे हा नको-रेवाद्यांचा हेतू होता व तो यशस्वी झाला.

हा असंतोष गेली बरीच वर्षे खदखदत असला तरी अलीकडचा आहे. पण त्यामागे विशेष इंग्रज मानसिकतेची जी ऐतिहासिक घडण आहे, ती आजच्या जागतिक वातावरणात अधिक प्रस्तुत आहे, ते पुढे पाहू.

युनिअनच्या इतर नागरिकांविरुद्धचा संताप हा एक भाग. त्यात भर म्हणून सार्वत्रिक भीतीचा माहौलही निर्माण करण्यात आला. सध्या आफ्रिका खंड व इराक, सिरिया, अफगाणिस्तान वगैरे देशांतून रोज हजारोंनी निर्वासित युरपच्या सीमांवर येतात. ते युनिअनच्या देशांनी वाटून घ्यावेत याला ब्रिटनचा सक्त विरोध आहे.तुर्कस्तान या मुस्लीम-बहुल देशाचा युनिअनमध्ये सामील होण्याचा गेली अनेक वर्षे प्रयत्न आहे. त्याला यश मिळाल्यास ते साडेसात कोटी तुर्क हां हां म्हणता ब्रिटन गिळंकृत करतील. असाही एक मुस्लीम-विरोधी, वंश-वर्ण-वादी निराधार मुद्दा नको-रे पक्षाने गाजवला.

नको-रे गटाच्या प्रचाराला प्रत्युत्तर देण्यात हवे-रे गट अगदीच कमी पडला. उदा. एखाद्या शहरातील रस्ता-दुरुस्तीसाठी युनिअनकडून पैसा मिळाला असेल, तर ते लोकांच्या पुढे आले



नाही. मात्र,एखाद्या शहरातील रस्ता-रुंदी लांबणीवर पडली तर नाही-रे गटाने त्याचे भांडवल केले व युनिअन वेळच्या वेळी पैसा देत नाही, म्हणून अशी कामे रेंगाळतात असा प्रचार केला. भले त्या कामाशी युनिअनचा काही संबंध नसो. ब्रिटन युनिअन मध्ये राहिलाच तर बाजारात फक्त सरळ असणारी केळी विकणे भाग पडेल, रेस्टोरांमधील मेनू अनेक भाषांत द्यावे लागतील, सात वर्षांखालच्या मुलांना फुगे फुगवायला बंदी येईल - इथपर्यंत अफवांची व अप-प्रचाराची मजल गेली. आणि लोकांनी त्यावर विश्वास ठेवला.

हवे-रे गटाची आणखी एक खेळी अंगाशी आली. आंतर-राष्ट्रीय नाणेनिधी, बँका, उद्योग धंदे, युरपमधील इतर देशांचे नेते व अगदी अमेरिकेच्या अध्यक्षापर्यंत सगळ्यांनी ब्रिटनने युरपमध्ये रहाणे श्रेयस्कर अशी वक्तव्ये केली. त्याचा परिणाम नेमका उलटा झाला. या वर्गाविरुद्धाचा लोकांचा राग आणखीच वाढला. यांच्यामुळे तर आमच्या देशात आम्हीच परके झालो आहोत, तेव्हा हे जर रहा म्हणत असतील तर युरप नक्कीच सोडला पाहिजे असा मतप्रवाह अधिक जोरावला.

या मतदानातील एक विशेष बाब म्हणजे, तरुण, उच्च शिक्षित, शहरी स्थिर नोकऱ्या असणारे, विद्यार्थी यांनी हवे-रे च्या बाजूने मतदान केले तर वयस्क, बेकारांनी, ज्यांना उद्याची भ्रांत आहे अशांनी, ग्रामीण भागाने नको-रे असे मतदान केले. इंग्रजांची मानसिकता देश बेट असल्याने मर्यादित केली आहे, असे म्हटले जाते! त्याचा हा दाखला. हा मुद्दा खाली स्पष्ट होईल.

**इंग्रजांची अस्मिता**

ऐतिहासिकदृष्ट्या या अस्मितेचे चार पायाभूत घटक मानले जातात. साम्राज्य (म्हणजे वसाहतवाद), चर्च, आरमार आणि कडेकोट बंदिस्त असणारी वर्ग-व्यवस्था (केवळ आर्थिक निकषांवर). दुसऱ्या महायुद्धानंतर कधीही सूर्य न मावळणारे काही

शतकांचे साम्राज्य लयाला गेले. तो विलय तसा अल्पावधीत झाला. तोपर्यंत वसाहतींच्या नैसर्गिक संसाधनांची लुबाडणूक करत साम्राज्य उभे राहिले व नागरिकांना सुबत्ता लाभली. तुमची साधन-संपत्ती आमची पण तुमचा एक माणूस आमच्या बेटाच्या भौगोलिक हद्दीत येऊ दिला जाणार नाही - हे शतकानुशतके चालत आलेले तत्त्व अचानक लागू पडेनासे झाले. त्याचा सल तेव्हापासून दृढ आहे.

चर्चचे महत्त्व विज्ञान, स्त्री-स्वातंत्र्य, लोकशाही अशा कालमानानुसार उत्तरोत्तर कमीच होत आहे. आज बहुसंख्य (९०% हून जास्त) चर्चला जात नाहीत किंवा निधर्मी असल्याचे सांगतात.

आरमाराचा आजचा अर्थ लष्कर. ते एकतर अमेरिकेच्या छत्राखाली आहे, अधिक महत्त्वाचे म्हणजे - पाकिस्तान, उत्तर कोरिया अशा बेजबाबदार अणुशक्ती व कोठेही कधीही प्रचंड नागरी हत्या करू शकणारे फुटकळ आत्मघातकी आतंकवादी यांच्याबाबत लष्कर निष्प्रभ आहे.

रहाता राहिली वर्ग-व्यवस्था - ती मात्र गेल्या तीस-चाळीस वर्षात जास्तच भक्कम झाली आहे, बँका, उद्योग यांच्या उच्चपदस्थांचे पगार, भ्रष्टाचाराचे, काळ्या पैशाचे भयकारी वाढते प्रमाण यामुळे वर्ग-भेद तीव्र होत आहेत, व्यवस्था अशी राहिलेलीच नाही. आहे-रे व नाही-रे मधील तफावत वाढत आहे. राज्य कल्याणकारी असूनही ही तफावत कमी करू शकलेले नाही, उलट, कल्याणकारी योजना कमीच होत आहेत.

या काहीशा अगतिक, काहीशा व्याकुळ, पण प्रामुख्याने संकुचित व न्यून-गंडाने पछाडलेल्या मन:स्थितीला राज्यकर्ते, युनिअन, पूर्व युरोपियन व इस्लाम हे दृश्य शत्रू सापडले आणि त्याचा राग नको-रे गट जिंकण्यात झाला. इतर नकोत कारण त्यांच्या वेगळ्या ज्ञान-व्यवस्था, जीवन-शैली आमच्या परंपरांना , जीवन-पद्धतीला, आमच्या अस्मितेला धोका आहे, या अर्थी संकुचितपणा व न्यून-गंड. आत्मविश्वास असणारा माणूस किंवा समूह 'येऊ द्या इतरांना' म्हणेल. वर म्हटल्याप्रमाणे हा पेच जगभर आहे आणि त्याचे समाधानकारक उत्तर कोठेच नाही. दिसते असे की या काल्पनिक रम्य भूतकाळ आणि सद्य राजकारणाची घृणा या दोन्हीचा परिणाम म्हणून चुकीची खोटी आश्वासने देणारे नको-रे गटाचे (ट्रम्पसारखे) नेतृत्व उदयाला येते व ही (अ)व्यवस्था ज्यांनी आणली, त्यांचेच प्रतिनिधी (क्लिंटन) पर्याय म्हणून पुढे येतात. सार्वमत जिंकल्यानंतर 'आता काय' हा प्रश्न नको-रेच्या नेतृत्वाला पडला आणि पुढचे काव्य आपण निस्तरू शकणार नाही हे ओळखून बहुतेकांनी राजकारणातून पळ काढला. ब्रिटनमध्ये सार्वमताआधीपासून सत्ताधारी हुजूर पक्षात हवे-रे व नको-रे हे दोन गट आहेत. ती फूट चालूच आहे. निश्चित धोरण असणाऱ्या नेतृत्वाचा आज अभाव आहे. विरोधी मजूर पक्षाची वाताहतही चालूच आहे. हा पक्ष नि:संदिग्धपणे हवे-रे बाजूचा होता. मात्र तो निष्प्रभ ठरला.

**प्रचारातील विखारी वातावरण**

एरवी ब्रिटनमध्ये सार्वत्रिक असोत, स्थानिक असोत, निवडणुका चालू आहेत हे कळतसुद्धा नाही. आपल्याकडच्या सारखा गदारोळ नसतो. यावेळी मात्र तापमान इतके वाढले की कधी न होणारी राजकीय हत्याही झाली. जो कॉक्स नावाची इंग्लंडमधील मजूर पक्षाची ४१ वर्षांची खासदार (दोन लहान मुलांची आई) हवे-रे गटाचा उत्साहाने पुरस्कार करत होती.विद्यमान राजकारण्यांना अपवाद म्हणावी अशी ही लोकांशी निगडित, प्रामाणिक स्त्री. आपल्या मतदार संघातील लोकांना भेटायला ती १६ जूनला जात होती. तिच्या कार्यालयाबाहेर, रस्त्यावर दुपारी एक वाजता एका ५२ वर्षांच्या गोऱ्या इसमाने तिला अनेकदा भोसकून व गोळ्या घालून ठार मारले. नंतर त्याला कोर्टात आणले गेले. त्याला त्याचे नाव विचारता त्याने आपले नाव 'देशद्रोह्यांना मृत्युदंड, ब्रिटनला स्वातंत्र्य' असे असल्याचे सांगितले. यावरून सामाजिक विद्वेष काय थराला गेला आहे, हे स्पष्ट व्हावे.

अशा घटना अमेरिकेत (किंवा आपल्याकडे) जितक्या सतत होतात तेवढ्याच ब्रिटनमध्ये क्वचित होतात. त्यामुळे सगळ्या देशालाच धक्का बसला व प्रचार काही दिवस थांबवण्यात आला.

**परिणाम**

होणाऱ्या परिणामांची आज फक्त चर्चा चालू आहे.ते राजकीय, आर्थिक, आंतर-राष्ट्रीय स्तरावर असे विविध होतील हे नक्की. ते स्पष्ट व्हायला अजून दोन ते सात वर्षे लागतील.

खरे तर १३ महिन्यांपूर्वीच हुजूर पक्ष मोठी आघाडी घेऊन सत्तेवर आला तेव्हा पंतप्रधान कामेरूनने पक्षांतर्गत विरोध मिटवावा म्हणून या सार्वमताची घोषणा केली होती. कामेरूनचा अंदाज असा होता की 'सार्वमत युरपमध्ये रहावे' या बाजूने जाईल व अंतर्गत विरोध बंद पडेल. तसे झाले नाही. युरपच्या बाजूने हिरिरीने प्रचार केल्याने त्याला राजीनामा मात्र द्यावा लागला.

पण स्कॉटलंड व उत्तर आयर्लंड या भागांनी मोठ्या प्रमाणावर 'युरपमध्ये राहावे' असे मतदान केले. ते प्रदेश ब्रसेल्सकडे 'लंडनला प्रतिबंध' या दृष्टीने पहातात. ब्रिटनमध्ये राहायचे का नाही या प्रश्नावर २०१४ला स्कॉटलंडमध्ये सार्वमत झाले होते व त्यात ब्रिटनमध्ये रहावे असा निर्णय झाला. पण आता बदललेल्या परिस्थितीत दुसरे सार्वमत घेतले जाणे शक्य आहे. स्कॉटलंडच्या नेत्या Nicola Sturgeon या तातडीने ब्रसेल्सला रवाना झाल्या व स्कॉटलंडला युनिअनमध्ये ठेवा अशी मागणी त्यांनी केली. (ती अमान्य झाली कारण स्कॉटलंड कागदोपत्री व युनिअनच्या दृष्टीने ब्रिटनचा भाग आहे.) आता त्या म्हणतात की ब्रिटनने

बाहेर पडण्याचा निर्णय मी व्हेटो वापरून रद्द करू शकते! म्हणजे, इंग्लंड एक ठरवते, तर स्कॉटलंड विरुद्ध ठरवते असे चित्र उभे राहू शकते. त्याहीपुढे जाऊन, स्कॉटलंड व उत्तर आयर्लंड ब्रिटनमधून बाहेर पडून स्वतंत्र देश म्हणून जन्माला येणेही शक्य आहे. मग ते युनिअनचे सभासद होतील. त्या संभाव्यतेत ग्रेट ब्रिटन 'ग्रेट' रहाणार नाही फक्त इंग्लंड (व कदाचित वेल्स) असे एक राष्ट्र होईल.

आताच लंडनमधून आपली कार्यालये हलवून ती जर्मनी किंवा हॉलंडला नेण्याच्या दृष्टीने बड्या बँका, दलाल व इतर अर्थ-संस्था चाचपणी करू लागल्या आहेत. लंडन युनिअनमध्ये असण्यामुळे आर्थिक व्यापाराला ज्या सुविधा होत्या, त्या आता जाणार. आज जागतिक अर्थ-कारणात लंडनचे महत्त्व न्यू यॉर्कच्या बरोबरीने आहे. ते जाणे ब्रिटनला चांगलेच महागात जाईल. अनेक नोकऱ्या जातील, महसूल जाईल. तीच शक्यता बहुराष्ट्रीय कंपन्यांबाबत. ब्रिटीश चलन, व्याज-दर यावर अनिश्चिततेचे सावट आहे.

ब्रिटनमध्ये मायदेशापेक्षा सुरक्षा आहे, पगार बरे आहेत यासाठी आलेल्या पूर्व युरोपिअन कामगारांना या निर्णयाची झळ बसायला सुरुवात झाली आहे. परवा एक तरुणी दुकानात मोबाईल फोनवर पोलिश भाषेत बोलत होती. तिला एका इंग्रजाने 'आता लवकरच स्वत:च्या देशाला जावे लागेल' असे धमकीवजा सुनावले. ब्रिटनमधील अकरा वर्षात तिला प्रथमच हा अनुभव आला. किंवा ट्रेनमध्ये तीन-चार परकीय त्यांच्या भाषेत आपापसात बोलत असतील तर आपल्याला ते आवडत नाही हे इंग्रज उर्मटपणे व्यक्त करू लागले आहेत. हे रोजचे लहान अपमान झाले. तो इंग्रजी जन्मजात कोत्या मनोवृत्तीचा भाग आहे, त्याला आता पोषक संधी मिळाली. पण यांना मायदेशी परत पाठवण्याचा इरादा एका मंत्र्याने जाहीर केला आहे. आजवर तरी परकीयांवर शारीरिक हल्ले सुरु झालेले नाहीत पण ती वेळ येणे नजीकच्या भविष्यात शक्य आहे.

युनिअनच्या घटनेप्रमाणे एखाद्या देशाला बाहेर पडायचे असेल तर घटनेतील ५० क्रमांकाचे कलम सक्रिय करावे लागते. आजवर अशी वेळ आलेली नाही पण आता ब्रिटनबाबत युनिअन 'लवकर निघा, आता चर्चा नाही' अशी भूमिका घेत आहे.नव्या पंतप्रधान तेरेसा मे यांनी दिलेल्या संकेतानुसार या वर्षाअखेरपर्यंत तरी ब्रिटन तसे पाऊल उचलणार नाही. कलम सक्रिय केल्यानंतर दोन वर्षांत त्या देशाला युनिअनमधून बाहेर पडावे लागते.

युनिअनच्या कडक भूमिकेमागे एक प्रमुख कारण आहे. फ्रान्स, हॉलंड, स्पेन, जर्मनी, इटली, ग्रीस, ऑस्ट्रिया; विशेषकरून या व युनिअनमधील इतर देशांतही अति-उजव्या शक्ती प्रबळ होत आहेत. त्या वर्ण-द्वेषी आहेत, युनिअनच्या विरोधी आहेत. ब्रिटनच्या निर्णयाने त्यांना चांगलेच बळ मिळाले आहे. यातील ऑस्ट्रियाचा पुढचा अध्यक्षही अशा पक्षाचा होण्याची शक्यता आहे. हंगेरीने मुस्लिम निर्वासित नकोत अशी भूमिका घेतली आहे. या सर्व शक्तींना आळा बसवण्यासाठी 'युनिअन सोडल्यास काय होते ते पहा' हे दाखवण्याचा युनिअनचा प्रयत्न आहे. त्यांना ब्रिटनचे उदाहरण करायचे आहे. युनिअनच्या एका पदाधिकाऱ्याच्या मते - जर या शक्तींना पाठिंबा मिळाला तर युरपबरोबर लोकशाहीचे स्वप्नही अस्तास जाईल.

आजवर ब्रिटन हा युनिअनमध्ये जर्मनीवर वचक होता. त्याच्या निर्गमनाने आता जर्मनी ही युनिअनमध्ये अनिर्बंधित शक्ती होण्याची शक्यता आहे. आजमितीला जर्मनी व फ्रान्स हे प्रमुख देश युनिअन शाबूत रहावी यासाठी प्रयत्नशील आहेत. बाकीचे परिस्थिती न्याहाळत आहेत. यातही फ्रान्स सततच्या आतंकवादी हल्ल्यांनी ग्रासला आहे. तर ग्रीससारख्या देशांत जर्मनद्वेष आहे.

अर्थात, युनिअनची महागडी नोकरशाही, त्यांचा तळागाळाशी तुटलेला संबंध, निर्वासितांचे लोंढे हाताळण्याची अक्षमता वगैरे कारणेही या परिस्थितीला जबाबदार आहेत.

अखेरचा बागुलबुवा किंवा खरीखुरी शक्यता म्हणजे रशिया. एका निरीक्षकाच्या शब्दांत रशियाचा अध्यक्ष पुतीनला जे दहा वर्षांत जमले नाही, ते ब्रिटीश मतदारांनी एका दिवसात करून दाखवले. युनिअन दुबळी करणे व NATO चा युरपवरील प्रभाव कमी करणे या दृष्टीने पुतीनचा प्रयत्न गेली दहा वर्षे आहे. त्यासाठी त्याने रशियाच्या आधीच्या अखत्यारीतील काही देशांची संघटना बांधली, NATOला आव्हान म्हणून रशियाने युक्रेनमध्ये ढवळाढवळ केली, क्रायमिया रशियाला जोडला, इत्यादी. आता रशियाचे लक्ष्य बाल्टिक देश असल्याचे म्हटले जाते. बाल्टिक देश म्हणजे बाल्टिक समुद्राच्या काठावरचे देश - त्यात लाटवीया, इस्टोनिया, लिथुअनिया ही छोटी पण स्वतंत्र राष्ट्रे येतात.

**निष्कर्ष**

सुज्ञ मतदार आणि त्या अनुषंगाने लोकशाहीचा (जनता जेथे राज्य करी!) फुगा फुटलेला आहे. राष्ट्राच्या, त्यातही वंशाच्या व इतिहासाच्या सीमांपलीकडे सामूहिक मानवी दृष्टी नेण्याचे प्रयत्न स्तुत्य असले तरी पोकळ आहेत. अनिश्चित एकविसाव्या शतकापेक्षा माणसे काल्पनिक भूतकाळ स्वीकारतात हे दिसत आहे.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*